# इतिवृत्त

प्रदूषित नदी पट्टे असलेल्या जिल्ह्यामध्ये स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची स्थापना करण्याबाबतच्या मा. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांच्या मूळ अर्ज क्र. ६७३/२०१८ प्रकरणी दि. २०-०९-२०१८ रोजीच्या निर्देशानुसार तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय दि. १३-१२-२०१८ च्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्हयासाठी स्थापन करण्यात आलेल्या स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण कृती दलाची (Special Environmental Surveilance Task Force) दि. ०१-०७-२०१९ रोजी दुपारी ४.०० वाजता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर येथे बैठक घेण्यात आली.

बैठकीस खालील सदस्य / प्रतिनिधी उपस्थित होते.

१. श्री. अनंत गुरव, नायब तहसिलदार, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर.
(मा. जिल्हादंडाधिकारी, कोल्हापूर तथा सदस्य यांचे प्रतिनिधी)

२. श्री. जे. बी. रिसवाडकर, पोलीस निरिक्षक, जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, कोल्हापूर.
(जिल्हा पोलीस अधिक्षक तथा सदस्य, कोल्हापूर यांचे प्रतिनिधी)

३. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष या नात्याने जिल्हा न्यायाधिश, कोल्हापूर तथा सदस्य यांचे प्रतिनिधी.

४. श्री. प्रशांत गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर.
(प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर तथा समन्वयक यांचे प्रतिनिधी)

५. श्री. संजय मोरे, क्षेत्र अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, कोल्हापूर.

६. डॉ. सुशिलकुमार शिंदे, क्षेत्र अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर.

बैठकीच्या सुरवातीस श्री. प्रशांत गायकवाड, उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, कोल्हापूर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीचा उद्देश व कार्यकक्षा याबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितले की, प्रदूषित नदी पट्टे असलेल्या जिल्ह्यामध्ये स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची स्थापना करण्याबाबतच्या मा. राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली यांच्या मूळ अर्ज क्र. ६७३/२०१८ प्रकरणी दि. २०-०९-२०१८ रोजीच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्यातील ५३ प्रदूषित नद्यांच्या पट्टयांमधील प्रदूषण कमी करण्याकरिता कृति आराखडा तयार करणे, त्याची अंमलबजावणी करणेकरिता नदी पुनरुत्थान समिती स्थापन करणे व राज्य शासनाच्या दि. १३-१२-२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार कोल्हापूर जिल्हयासाठी स्थापन करण्यात आलेल्या स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण दलाची बैठक घेण्यात येत आहे तसेच पंचगंगा नदी प्रदूषण पट्टा प्राथम्य क्र. ५ मध्ये येत असल्याचे सांगितले.

यानंतर बैठकीमध्ये पुढील निर्णय घेण्यात आले :-

१. पंचगंगा नदीच्या प्रदूषीत पट्टयात संबंधीत विभागाने वाळू उत्खनन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२. पंचगंगा नदी प्रयाग चिखलीपासून वाहत जाऊन तिचा नृसिंहवाडी येथे कृष्णा नदीस संगम होतो. नदी कोल्हापूर जिल्हयातील करवीर, हातकणंगले व शिरोळ या तीन तालुक्यातून वाहते. त्यामुळे या तालुक्यातील संबंधित तहसिलदार यांना जिल्हा खणीकर्म अधिकारी यांनी नदीतून वाळू उत्खनन होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत व त्याबद्दल उपलब्ध माहिती समितीस पुरविण्याबाबत कळविण्यात यावे. तसेच पुढील बैठकीस जिल्हा खणीकर्म अधिकारी, कोल्हापूर यांना आमंत्रित करावे.

३. पंचगंगा नदीतून वाळू उत्खनन होऊ नये यासाठी समितीमार्फत जिल्हा खणीकर्म अधिकारी यांना पत्र देण्यात यावे.

वरील चर्चेनंतर श्री. प्रशांत गायकवाड यांनी स्वतंत्र पर्यावरण सनियंत्रण कृती दलाची बैठक संपल्याचे जाहीर केले.

(प्रशांत गायकवाड)
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मं, कोल्हापूर
तथा समन्वयक यांचे प्रतिनिधी